# शिवाजी विद्यापीठ,

## कोल्हापूर, महाराष्ट्र

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र



**एम. ए. भाग- २ : मराठी**

**सत्र ३ : अभ्यासपत्रिका क्र. १२.३**

**सत्र ४ : अभ्यासपत्रिका क्र. १६.३**

# बोलीअभ्यास

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

# बोलीअभ्यास

**एम. ए. भाग २ : मराठी**

**सत्र ३ : अभ्यासपत्रिका क्र. १२.३**

**सत्र ४ : अभ्यासपत्रिका क्र. १६.३**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून

**बोलीअभ्यास**

एम.ए.भाग २: मराठी

अभ्यासपत्रिका क्रमांक १२.३ व १६.३

२०२४ पासून होणाऱ्या परीक्षांसाठी

© कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

प्रथमावृत्ती : २०२०

सुधारित आवृत्ती : २०२३

सुधारित द्वितीय आवृत्ती : २०२४

एम. ए. भाग-२ करिता

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही

प्रती : ५००

■

प्रकाशक :

**डॉ. व्ही. एन. शिंदे**

कुलसचिव,

शिवाजी विद्यापीठ,

कोल्हापूर : ४१६ ००४

■

मुद्रक :

**श्री. बी. पी. पाटील**

अधीक्षक,

शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,

कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-89327-86-1

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक आणि शीर्षक |
|---|---|
| **सत्र तिसरे : अभ्यासपत्रिका क्रमांक १२.३ : बोलीअभ्यास** | |
| **प्रा. डॉ. शिवाजी पाटील**<br>आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, कोवाड | १. भाषा, बोली आणि समाज |
| **डॉ. मोहन लोंढे**<br>पी.व्ही.पी. महाविद्यालय, कवठेमहांकाळ | २. बोली : स्वरूप, वैशिष्ट्ये |
| **प्रा. गुंडोपंत पाटील**<br>न्यू कॉलेज, कोल्हापूर | ३. बोलीभाषांची निर्मिती |
| **डॉ. प्रकाश दुकळे**<br>देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक महाविद्यालय,<br>चिखली, ता. शिराळा, जि. सांगली | ४. बोलीअभ्यासाचे महत्त्व |
| **सत्र चौथे : अभ्यासपत्रिका क्रमांक १६.३ : बोली अभ्यास** | |
| **डॉ. युवराज देवाळे**<br>कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी | १. बोली : संरचनाविचार |
| **डॉ. निता दीपक भिसे-ढावरे**<br>सहायक प्राध्यापक, दूरशिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २. बोलीअभ्यास : समाजभाषावैज्ञानिक दृष्टिकोन |
| **डॉ. आनंद बल्लाळ**<br>आजरा महाविद्यालय, आजरा | ३. बोली : इतिहास आणि भूगोल |
| **डॉ. एकनाथ आळवेकर**<br>विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर | ४. क्षेत्रीय अभ्यास : परिसरातील बोलीचा अभ्यास |

■ संपादक ■

**डॉ. नीलेश शेळके**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज

# क्षेत्रीय अभ्यास : परिसरातील बोलीचा अभ्यास

## ४.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला,

१. क्षेत्रीय अभ्यास पद्धती समजावून घेता येईल.

२. परिसरातील बोलींचा अभ्यास या अनुषंगाने सांगली, सातारा आणि कोल्हापूर परिसरातील बोलींचा भाषिक प्रदेश कोणता, याबद्दल जाणून घेता येईल.

३. सातारा, सांगली आणि कोल्हापूर परिसरातील क्षेत्रीय पाहणी करून त्या बोलीचे वेगळेपण कोणते, हे समजावून घेता येईल.

४. सांगली, सातारा, कोल्हापूर आणि महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रदेशातील मराठीच्या बोलींचे संकलन आणि विश्लेषण करून अभ्यास करता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

'बोली' हा शब्द ग्रीक भाषेमध्ये सर्वप्रथम वापरला. ग्रीक भाषेमधून हा शब्द युरोपियन भाषांमध्ये रूढ झाला. 'बारा कोसाला भाषा बदलते', या उक्तीनुसार बारा कोसाला भाषा बदलत असेल, असा अर्थ घेतला जातो. पण बारा कोसाला भाषा बदलत नसून त्यातील वैशिष्ट्ये बदलतात. ही वेगवेगळी वैशिष्ट्ये विविध बोलींशी संबंधित असतात. 'बोलली जाणे' ही कोणत्याही भाषेची पहिली आणि प्रधान अट असते. 'बोली' म्हणजे एखाद्या व्यापक भाषिक परिसरातील प्रादेशिक भाषा या अर्थाने 'बोली' ही संज्ञा वापरली जाते.

### 'बोली' व्याख्या

बोलीची व्याख्या अनेक भाषा अभ्यासकांनी केली आहे. त्यातून बोलीचे वेगळेपण जाणवते. सु. बा. कुलकर्णी यांनी पुढीलप्रमाणे बोलीची व्याख्या केली आहे. ते म्हणतात, "सामान्यत: ज्या भाषाभेदांना लेखनपरंपरा नाही व जे आपल्या अस्तित्वात केवळ मौखिक परंपरेवर अवलंबून असतात अशा भाषाभेदांना बोली (Dialect) अशी संज्ञा आहे." (पृष्ठ ७१, 'भाषा व साहित्य : संशोधन'- संपादक डॉ. वसंत जोशी)

"ज्या व्यक्तीसमूहाला आपण पूर्णपणे एकरूप असे भाषिक स्वरूप वापरतो असे वाटते, त्यांची भाषा म्हणजे बोली. ही एकरूपता तात्विक स्वरूपाची असते आणि भाषेच्या सामाजिक प्रस्नात असणे यापेक्षा वाटणे याला बहुतेकवेळा अधिक महत्त्व असते." (मराठी विश्वकोश, खंड ११, पृष्ठ ९२८)

बोलीची व्याख्या करताना विजया चिटणीस-माडगूळकर म्हणतात, "बोली म्हणजे परभाषकांना जवळजवळ पूर्णपणे कमी-अधिक प्रमाणात सारख्या वाटणाऱ्या तर तदभाषकांना पूर्णपणे एकरूप वाटणाऱ्या व्यक्तीभाषकांचा समूह होय." (पृ.१९७, आधुनिक भाषाविज्ञान) बोली म्हणजे एका निश्चित भूभागात